# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २६/०८/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील माथनी टोल नाका मौदा येथे दिनांक २५/०८/२०२२ चे ०१.०९ वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–३६/एए–२७०१ क्रमांकाच्या बोलेरो पिकअप गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– १. चेतन सुखदेव भुरे, वय ३० वर्ष, रा. केसलापुर, २. निखील पाडुरंग खोब्रागडे, वय ४५ वर्ष, रा. शहापुर व ३. तेजस लिलाधर भुरे, वय ३० वर्ष, रा. केसलापुर याच्या ताब्यातुन १२(गाई) १,८०,०००/–रू. जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण किंमती ७,८०,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. संजय बरोदिया, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(११)(डि) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५,९ महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम ३४ भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गोतम मेश्राम मो.क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री मुख्तार बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन देवलापारचे ठाणेदार पोलिस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक जगदीश बिरोले, पो. हवालदार संतोष तिवारी, पोलीस नायक संजय बरोदिया यांनी यशस्वीरित्या पार पाडली.





## घरफोडी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील विठ्ठल रूक्मीनी मंदीर, टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपूर येथे दि. २५/०८/२०२२ चे २०.०० वा. ते २६/०८/२२ चे ०४.४५ वा. सुमारास आरोपी नामे– संतोष सुरेश राजपुत, वय ३८ वर्ष, रा. रामटेके नगर झोपाडपट्टी, अजनी बेलतरोडी नागपूर याने विठ्ठल रूक्मीनी मंदीरातील दानपेटी फोडुन त्यातील रूपये चोरून घेवुन जात असतांना गावातील काही लोकांना दिसुन आल्याने चोर चोर असे ओरडले असता तो पळुन गेला. तसेच त्याचे जवळ असलेले दोन लोखंडी रॉड मंदिराचे बाजुला पडलेले दिसुन आले. तेव्हा पोलीस तसेच गावातील मुले आरोपीला शोधत असता मंदिराचे मागचे भागात असलेल्या ग्रामपंचायतचे सांडपाणी जाणे करीता गोल मोठया सिमेंट पायल्या टाकलेल्या असुन मध्ये चेंबर आहे. तेव्हा एक पोलीस हे चेंबर चे झाकण उघडुन आत पाहिले असता एक आरोपी लपुन मिळुन आला. त्याचे सोबत असलेला दुसरा साथीदार नामे– सुरेश जंगठे रा. कान्होलीबारा हा पळुन गेल्याचे सांगितले. तेव्हा पोलीसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याचे जवळ मंदिरातील दान पेटी मधुन चोरी केलेले ७,३०/– रू. मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शेषराव नत्थुजी भोयर, वय ६९ वर्ष, रा.वार्ड न १ जुनी ग्रामपंचायत जवळ टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपूर मंदीर सचिव यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड मो.क्र. ९५११८१७१८९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०.५ कि. मी. अंतरावरील वार्ड क्र २ खापरखेडा येथे दि. २४/०८/२०२२ चे २०.०० वा. ते २३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर नंदलालजी खांडेकर, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र ०२, खापरखेडा हे ठेकेदाराचे काम करीत असुन घराचे दरवाजाला कुलुप लावुन कामाला गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने घराच्या समोरील दरवाजाचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने हॉलमध्ये ठेवलेले दोन लोखंडी कपाटाचे दाराचे कुलुप तोडुन कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले नगदी १०,०००/–रू., १) ईंडीयन कंपनीचे सिलेंडर भरलेले किंमती ४,०००/–रू. २) गॅस शेगडी किमंती ४,५००/–रू., ३) मोठे गंज ४ नग किमंती २,०००/–रू. ४) जर्मनचे मोठे डबे ६ नग किमंती ६,०००/–रू., ५) होमथेयटर किमंती १५,०००/–रू., ६) होमथेयटर बक्से ४ नग किमंती ८,०००/–रू., ७) नळाचा पाईप लोखंडी किमंती २,०००/–रू. ८) ईलेक्ट्रीक प्रेस किमंती ५,००/–रू. ९) तावे ४ नग लोखंडी किमंती ६,००/–रू. व नगदी १०,०००/–रू. असा एकुण कि. ५२,६००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा उमेश ठाकरे मो नं ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा उदासा उमरेड येथे दि. १९/०८/२०२२ चे १३.३० वा. सुमारास बीएसएनएल चे उदासा येथे असलेल्या टावरचे सामान २ जी चे ३ टी जी किंमत ६,०००/–रू., ३ एएनसी किंमत ६,०००/–रू., ४०० एएमपी च्या २५ बॅटऱ्या किंमती २५,०००/–रू. व १,०००/–रू. एएमपी ची १ बॅटरी सेल किंमती १,०००/–रू. असा एकुण किंमती ३८,०००/–रू. रॅकमध्ये ठेवलेला सामान अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विनय मधुकर मुरापे, वय ४२ वर्ष रा. झिंगाबाई टाकळी, प्लॉट नं ३२, नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला

आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रशांत खोब्रागडे मो.नं. ८८८८८१७१८३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील मौजा शिवनी भोडकी शिवार येथे दि. २४/०८/२०२२ चे १९.३० वा. ते २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— कैलास हिराचंद कावळे, वय ४१ वर्ष, रा. शिवनी भोडकी यांच्या शेतामध्ये लागलेले सोलार पंपचे पॅनल किंमत ३०,०००/— रू. चा मुद्देमाल आरोपी नामे— दिलेश्वर वसंतराव शेन्डे, वय ४१ वर्ष, रा. मेंढा, ता. तिरोडा जि. गोंदिया हा चोरी करतांना मिळून आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ओमप्रकाश कोडवते मो नं. ९५४५८४४७८८ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. बुटीबोरी** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा मोहगाव शिवार उडान पुलावर येथे दिनांक २५/०८/२२ चे १९.०० वा. ते १९.१५ वा. सुमारास अनोळखी पुरूष मृतक हा पायदळ सायंकाळचे सुमारास रस्त्याने जात असतांना त्याला अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजिपणे चालवुन पायदळ जाणाऱ्या अनोळखी पुरूष यास धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी करून त्याच्या मरणास आरोपी कारणीभुत ठरला व वाहनासह पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— युवराज केशवराव नटे, वय ३६ वर्ष, रा. प्रभाग क्र ०५, बुटीबोरी ता.जि. नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी प्रशांत भोयर मो नं ९९२३१११२७० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत आसोली येथे दिनांक ०२/०८/२०२२ चे १२.३० ते १२.४० वा. सुमारास मृतक/आरोपी नामे— निखील दशरथ मोहोड, वय २० वर्ष, रा. घोडपड कामठी हा महालगाव वरून कापसी पेटोलपंप कडे जात असता आसोली गावा जवळ ब्रेकर वर मोटरसायकल उसळल्याने त्याच्या डोक्याला छातीला डाव्या पायाला मार लागला. त्यास उपचाराकामी भवानी दवाखना नागपूर येथे नेले त्यानंतर मेडीकल कॉलेज नागपुर ट्रामा क्रेयर सेंटर दि ०३/०८/२२ रोजी भरती करण्यात आले होते. उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तपासून दि २५/०८/२०२२ चे १२.१० वा. त्यास मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा विकास बेलसरे पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी चौधरी मो.क्र. ७०३८८२२०५ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कोंढाळी:–** दिनांक २४/०८/२०२२ चे ०९.३० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १५ वर्ष ही पायदळ शाळेत जात असतांना आरोपी नामे– जय गौतम, रा. बाजारगाव तिला स्वताचे दुकानात बालवुन तिला लज्जा उत्पन्न होईल असे शब्द बोलुन 'तुझे एका मुलासोबत लफडा आहे' असे म्हणुन तिच्या दाव्या गालावर चापट मारली व विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ) भादंवी. सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मिना बारंगे मो.नं ८७८८७५८१४२ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील वार्ड क्र १५ गायत्री मंदीर पहलेपार सावनेर येथे दिनांक २५/०८/२०२२ चे ०६.३० वा. सुमारास **जयनारायन गणपत भोगा (मृतक), वय ५८ वर्ष, रा. वार्ड क्र. १५, गायत्री मंदीर पहलेपार सावनेर** यांचे फिटचे आजाराने प्रकृती खराब झाली. त्यांना उपचाराकामी ग्रामीण रुग्णालय सावनेर येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिपक जयनारायन भोगा, वय ३१ वर्ष, रा. वार्ड क्र. १५, गायत्री मंदीर पहलेपार सावनेर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ राजेन्द्र यादव मो.नं ९४२३६०२९८७ हे करीत आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**